नि. दि. दा. क्र.९८/२०२१
सतिश वि. ज्ञानेश्वर व इतर
निशाणी क्र. ६७ लगत

**वादीतर्फे सा.क्र.२ यांचा पुढील सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. आर.एच.कर्णे यांच्यामार्फत शपथेवर सुरु–**

आता मला माझे पुराव्याचे शपथपत्र दाखवण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास नि.क्र. ६७ देण्यात येत आहे. आता मला संचिकेवर दाखल वाटपपत्र क्र.४०६३/२०१५ दाखवण्यात आले. सदर वाटपपत्रास मी संमती म्हणून माझी सही व अंगठा आहे. त्यातील मजकूर मी वाचला होता, तो बरोबर आहे. वाटणीपत्र करुन ठेवणार यांनी माझ्या समक्ष त्यावर सहया केल्या होत्या. सदर वाटणीपत्रास यापूर्वी नि.क्र.६० देण्यात आली आहे. आता मला संचिकेवर दाखल वाटणीपत्र क्र.९००/२०१७ दाखवण्यात आले. सदर वाटणीपत्रावर वाटणीपत्र करुन ठेवणार म्हणून माझी सही व अंगठा आहे. सदर वाटणीपत्रावर करुन ठेवणार म्हणून माझे वडिल दादाराम गावडे यांची सही व अंगठा आहे. सदरचे वाटणीपत्र हे मी व माझ्या वडिलांनी गट क्र. ५९ व गट क्र. २२ केले होते व त्यापैकी गट क्र. ५९ मधील ३६ आर माझ्या वाटणीला आले होते. तसेच, माझ्या वडिलांच्या हिश्श्याला गट क्र. २२ मधील ७ आणे ८ पै हिस्सा दिला होता व बोअरवेल मधील पाणी व मोटार यातील १२ आणे हिस्सा दिला होता. सदर वाटणीपत्र मी वाचले होते, त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ६८** देण्यात येत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**प्रतिवादी व तर्फे विधीज्ञांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर. करीता, प्रतिवादींतर्फे उलटतपास नाही.**

फलटण. (ए.एस. साटोटे)
दिनांकः ०२.०२.२०२६ २ रे सह दिवाणी न्यायाधीश 'क' स्तर, फलटण